# कलाजगताचा 'कोहिनूर'

## कारभारी जिल्ह्याचे

नगरच्या साहित्य-नाट्य व सांस्कृतिक कलाजगतातील अनेक जण देशविदेशांत नावाजले गेलेत... अर्थात यांतील बहुतेकांना नगर सोडल्यावरच नावलौकिकाची चव चाखता आली... पण हा बहाद्दर मुंबईत गाजत असताना 'नगरला मोठं करण्याचं' वेड घेऊन परतला... इथल्या आप्तस्वकीय व मित्रपरिवाराकडून कधी उपेक्षेचे टोमणे ऐकत, तर कधी थोडंफार कौतुक झेलत 'प्रयोग' करीत राहिला... त्यातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर 'नगर'ला नेण्याचं वेड मात्र कधी पूर्ण करून गेला, हे नगरकरांनाही कळलं नाही... असा कलाजगताचा कोहिनूर म्हणजे प्रसिद्ध शिल्पकार प्रमोद कांबळे.

बाळ ज. बोठे
bal.bothepatil@esakal.com



### प्रमोद कांबळे यांचा जीवनपट

- नाव : प्रमोद दत्तात्रय कांबळे
- जन्म : ११ ऑगस्ट १९६४
- मूळ गाव : संवत्सर (ता. कोपरगाव)
- शिक्षण : जी. डी. आर्ट (सुवर्णपदक)
- प्रसिद्ध चित्रकार व शिल्पकार

### भूषवीत असलेली व भूषविलेली पदे

- सदस्य, महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळ अभ्यासक्रम समिती
- सदस्य, राज्यस्तरीय कला प्रदर्शन
- परीक्षक पॅनेल, कला संचालनालय.
- सदस्य, रोटरी क्लब, नगर.
- संस्थापक, कलाजगत न्यास, नगर.
- संचालक, कलाश्री क्रिएशन्स कंपनी.
- सदस्य, मतिमंद शाळा, नगर.
- सदस्य, रचना कला महाविद्यालय, नगर
- सदस्य, सुनीता चित्रकला महाविद्यालय, श्रीरामपूर

### मिळालेले पुरस्कार व सन्मान

- 'द स्पिरिट' व 'वॉर मेमोरिअल'बद्दल लष्कराकडून सन्मान
- चित्रकूट 'नन्ही दुनिया'बद्दल राष्ट्रपतींकडून सन्मान.
- बॉम्बे आर्ट सोसायटी पुरस्कार
- राज्य सरकारचा उत्कृष्ट चित्र-शिल्प पुरस्कार
- सीड प्रदर्शन पुरस्कार
- अशोक जैन पुरस्कार
- सावेडी भूषण पुरस्कार (एकूण ३२ पुरस्कार)

**बाळ ज. बोठे**
bal.bothepatil@esakal.com

**प्रसंग पहिला** : नगरच्या बस स्थानकाजवळील महावीर कलादालनात विविध कार्यक्रमांनिमित्त जाणारा प्रत्येक जण मान वर करून समोरच्या भिंतीवर पाहतो... 'सारे जहाँ से अच्छा' पाहून त्याचे डोळे विस्फारतात... चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव जमतात... कोणी केलं... कसं केलं... छानच हं... असे शब्द मनातून उमटू लागतात... आपसुकच मनापासूनची दाद मुखातून बाहेर पडते...

**प्रसंग दुसरा** : सावेडीच्या कुष्ठधाम रस्त्याने जाताना गुलमोहर रस्त्याकडे वळल्यावर समोरचा भलामोठा हत्ती पाहून धडकीच भरते... त्याच वेळी रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला गोरिला, हरीण, मगर, वाघ, गेंडा, काळवीट, घोडा असे अगदी खरेखुरे वाटणारे भव्यदिव्य प्राणी व त्यावर खेळणारी लहान मुले दिसू लागतात अन्... कोणी केले... कसे केले... ग्रेटच... असे मनातले शब्द दाद देणारेच... हे दोन्ही प्रसंग तसे निमित्तमात्रच. अशा अनेक चित्र-शिल्प प्रयोगांतून, गरीब वृद्धेने चेहऱ्यावर बोटे फिरवून केलेल्या मायेपासून थेट राष्ट्रपतींची पाठीवरील शाबासकीची थाप मिळेपर्यंत वाखाणणी मिळविणारा... लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांमध्ये हसतखेळत मिसळणारा... आजवरच्या आयुष्यात समाजाकडून, कलाप्रेमींकडून मान-अपमान, दाद-अवहेलना सहन करीत शून्यातून विश्व निर्माण करणारा कलावंत म्हणजे प्रमोद कांबळे.

नगरच्या मातीत वाढलेल्या प्रमोदची आजपर्यंतची कलाजगताची वाट बरीच खडतर म्हणावी लागेल. अगदी रस्त्यावर उभे राहून पतंग व चित्रे विकण्यापासून, तसेच वडा-पाव खाऊन पोट भरण्यापासून ते आज देश-विदेशांतील कलाप्रेमींकडून मिळणारी दाद स्वीकारीत सुरू असलेली त्याची वाट आज पक्की व्यावसायिक झाली असली, तरी त्यातही प्रयोगशीलता जपत त्याने नावीन्याची आस धरली आहे. गरजवंताला मदतीचा हात देतानाच 'स्वतः अनुभवलेले दिवस' भावी कलावंतांवर येऊ नयेत म्हणून हातचे काही राखून न ठेवता मनमोकळे मार्गदर्शन करण्याचे मनाचे मोठेपणही त्याच्यापाशी आहे.

प्रमोदचे बालपण हलाखीचे होते. नगरच्या प्रगत कला विद्यालयातील कलाशिक्षक दत्तात्रय कांबळे यांचा तो मुलगा. त्याचे अन्य तिघे बंधूही उत्कृष्ट चित्रकार आहेत. प्रमोदला शिल्पकलेची विशेष आवड असल्याने, लहानपणापासून सीना नदीतील काळ्या मातीपासून मूर्ती तयार करण्याचे प्रयोग त्याने केले. गणपती कारखान्यांसमोर उभे राहून, गणपती कसे तयार केले जातात, हे न्याहाळले. स्वतः तसे प्रयत्न केले. कधी जमले, तर बऱ्याचदा चुकले. अखेर गुरू र. बा. केळकरांनी त्याच्या डोक्यावर आशीर्वादाचे हात ठेवले. वडिलांना सांगून वेगवेगळे प्रयोग करायला संधी मिळवून दिली. त्यातूनच प्रमोदमधील कलावंत घडू लागला. सातवीला असतानाच केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या विशेष प्रावीण्य शिष्यवृत्तीसाठी शिल्पकलेमध्ये देशात त्याने पहिला क्रमांक मिळविला. आठवी-नववीच्या वर्गात असताना घरात मात्र अठरा विश्वे दारिद्र्याची स्थिती. वडिलांची नोकरी गेलेली. परिणामी संक्रांतीला पतंग गणपतीत आरास, दिवाळीत आकाशकंदील तयार करून विकत, तसेच पेंटरच्या हाताखाली बोर्ड रंगवत, सकाळी घरोघरी वृत्तपत्रे टाकत, निवडणूक काळात भिंती रंगवत पोटापाण्यासह कलाभ्यासाचा ध्यास घेतलेला प्रमोद दहावीची परीक्षा ५२ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला. प्रगत कला विद्यालयात त्याने फाउंडेशन कोर्स करून मुंबईला सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टला शिल्पकला (स्कल्प्चर) शिक्षणासाठी दाखल झाला. मुंबईतील त्याचे हे शिक्षणही सहजसोपे नव्हते. खासगी आर्ट गॅलरीत एक रुपया तासावर काम करीत, वसतिगृहावर राहत, वडा-पाववर गुजराण करीत वाटचाल करणाऱ्या प्रमोदने तेथील वसतिगृहात 'चहा-भात' खाऊन, वर ही वेगळी 'डिश' अन्य मुलांमध्ये प्रसिद्धही केली. वसतिगृहातील अन्य विद्यार्थ्यांचे प्रोजेक्ट करून देत, चित्रपटांचे बॅनर रंगवीत, बस थांब्यावर थांबून समोर दिसेल त्या माणसाचे पोर्ट्रेट काढत, थोडे-फार पैसे कमावत गुजराण करीत व त्याबरोबरच अभ्यासही करीत त्याने या अभ्यासक्रमात सुवर्णपदक पटकाविले. या काळात महाविद्यालयात स्केचिंगची लागोपाठ दोन बक्षिसे, तसेच बॉम्बे आर्ट सोसायटीची बक्षिसेही मिळविली. मुंबईच्या कलाजगतामध्ये बऱ्यापैकी नाव झाले असल्याने, शिक्षणानंतर चित्रपट उद्योगात दिवसाला हजार रुपये दराने विविध कामे मिळत असतानाही तेथे तो फार काळ रमला नाही. स्वतःचं काहीतरी करायला पाहिजे, या विचारातून तेथील सारे सोडून नगरकडे निघाला. रस्त्यात पुण्याला थांबल्यावर तेथील काही शिक्षक व मित्रांनी 'नगरला काय ठेवलंय' असं म्हणून त्याला पुण्यातच काहीतरी करण्याचे सांगितले. त्यामुळे तेथे तो थांबला; पण रमला नाही.

तेथे कशीबशी दोन वर्षे काढली आणि तेही विश्व सोडून नगरची वाट धरली.

मुंबईचं झगमगतं आयुष्य सोडून पुणे व तेथून नगरला अगदीच भणंग अवस्थेत आलेल्या प्रमोदला पहिल्यापासून सुरवात करावी लागली. त्याचे एकेकाळचे मित्र चांगले स्थिरस्थावर झाले होते. गणेशोत्सवात देखावे, लग्नपत्रिका डिझाईन, पोर्ट्रेट, व्हिजिटिंग कार्ड, तमाशाची पोस्टर्स असे करता करता हळूहळू त्याचं नाव होऊ लागलं. याच काळात एक आव्हानात्मक उपक्रम त्याने हाती घेतला. भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव देशभर उत्साहात साजरा होत असताना यात आपलेही काही योगदान असावे, या हेतूने महापालिकेच्या महावीर कलादालनातील ७० फूट बाय २० फूट आकाराच्या भिंतीवर ५०० भारतीय सुपुत्रांचे आगळेवेगळे पेन्सिल चित्र रेखाटायला घेतले. स्वातंत्र्यलढ्यातील नेते, क्रांतिकारक, क्रीडापटू, तसेच साहित्य,

सामाजिक, संगीत, धर्म, विज्ञान आदी क्षेत्रांत आपल्या कर्तृत्त्वाने इतिहास घडविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचे 'सारे जहाँसे अच्छा' हे पेन्सिल स्केच चित्र त्याने सलग ७२ दिवस, म्हणजे १ हजार ७२८ तास रेखाटन करून हे आव्हानात्मक काम पूर्ण केले. अर्थात हे काम करताना तत्कालीन नगरपालिका, प्रशासन यंत्रणा, मित्रपरिवार, सामाजिक संस्था, पेन्सील कंपन्या, आर्थिक चणचण, रसिकांचे प्रेम, आग्रह, दमबाजी अशा अनेकविध अनुभवांचा 'खजिना' त्याच्याकडे आहे. या पेन्सिल चित्राला ११ वर्षे झाली आहेत. महापालिकेने योग्य निगा न राखल्याने त्याचे आयुष्य कमी होत असले, तरी लौकिक मात्र आजही कायम आहे. देश-विदेशांतील अनेक रसिकांनी हे चित्र पाहून श्री. कांबळे यांच्या चित्रकलेचे मनापासून कौतुक केले. शिवाय या चित्राने दिलेले 'नाव' त्याला चित्र-शिल्पकलेत नवनवे 'प्रयोग' करण्यास प्रोत्साहन देऊन गेले. त्यानंतर त्याने नगरमध्ये विविध उपक्रम व कार्यक्रमांनिमित्त येणाऱ्या मान्यवरांची चित्रे रेखाटून वा शिल्प तयार करून त्यांना ती अनोखी भेट देण्याचा उपक्रम सुरू केला. शास्त्रज्ञ जयंत नारळीकर, चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल व राजदत्त, व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण, भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी, शृंगेरी विद्यातीर्थांचे आद्य शंकराचार्य, तत्कालीन राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर, ज्येष्ठ नेते शरद पवार, पंडित भीमसेन जोशी, दिवंगत समाजवादी नेते मधू दंडवते, लेफ्टनंट जनरल पी. एस. जोशी आदींच्या चित्र-शिल्प रेखाटनांतून त्याचे कलाकौशल्य देशभरात पोचले. त्यानंतर 'एमआयआरसी'चा गौरवशाली इतिहास दाखविणारे 'द स्पिरिट' हे पेन्सिल चित्र १० फूट बाय १० फूट भिंतीवर रेखाटले. शिवाय नंतर 'वॉर मेमोरिअल' हे भव्य-दिव्य शिल्पही तयार करून देशभरातील लष्करी अधिकाऱ्यांकडून प्रशंसा मिळविली.

प्रमोदच्या आयुष्यातील खरा आनंदच नव्हे, तर देश-विदेशांतून कौतुक मिळवून देणारे काम म्हणजे मध्य प्रदेशातील चित्रकूट येथे त्यांनी उभारलेली 'नन्ही दुनिया.' आई व मूल ही संकल्पना घेऊन वात्सल्यदर्शी प्राणिशिल्प असणारी नानाजी देशमुख यांच्या कल्पनेतील ही 'दुनिया' इतकी सुरेख झाली, की तेथील विविध प्राण्यांची हुबेहूब शिल्पे पाहून तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जाम खूष झाले. त्या वेळी सुरक्षा व्यवस्थेमुळे त्यांच्या जवळ नसलेल्या श्री. कांबळे यांना त्यांनी खास बोलावून घेऊन तब्बल १४ मिनिटे या प्रकल्पावर चर्चा केली. पाठीवर शाबासकीची थाप टाकली. कारगिल युद्धातील शहीद व जखमी जवानांच्या मदतीसाठीही त्यांनी अशाच पद्धतीने २१ हजार रुपये दिले. पत्नी सौ. स्वाती यांच्या मदतीने 'कलाजगत न्यास' स्थापन करून, त्याद्वारे नगरच्या उदयोन्मुख कलावंतांना पुण्या-मुंबईतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, लहान मुलांमध्ये शिल्पकलेची आवड निर्माण व्हावी म्हणून 'स्वतःच्या हाताने गणपती बनवा' उपक्रम, तसेच वर्षभर चित्रकला व शिल्पकलेच्या विविध स्पर्धा व प्रदर्शने, सुटीच्या काळात रंगसंस्कार कला शिबिरे आयोजित केली आहेत. देशातील विविध कला महाविद्यालयांमध्ये चित्र-शिल्पकलेची प्रात्यक्षिकांसह व्याख्यानेही तो देतो.

गुलमोहर रस्त्यावरील निवासस्थानाजवळ प्रमोदने आर्ट गॅलरी उभारली आहे. तेथील त्याची चित्रे-शिल्पे पाहण्यासाठी दिवसभर गर्दी असते. पाइपलाइन रस्त्यावरील त्याच्या स्टुडिओमध्ये देश-विदेशांतील अनेक कामे सुरू आहेत. आजपर्यंतच्या कलाप्रवासात स्वतःच्या काही कलाकृती त्याला आजही आगळीवेगळी अनुभूती देऊन जातात. शाळेत असताना 'चिलिया बाळ व उडणारा हनुमान' या पुठ्ठ्याच्या आराशी, 'मायकल अँजेलो'च्या पुस्तकातून रेखाटलेली 'पियत्ता', 'डेव्हीड' व 'गुलाम' ही शिल्पचित्रे, नरेंद्र ताम्हाणे गौरवार्थ झालेल्या

क्रिकेट सामन्यासाठी आलेल्या सुनील गावसकर, अजित वाडेकर व अन्य क्रिकेटपटूंची रेखाटलेली चित्रे व त्यांवरील त्यांच्या स्वाक्षऱ्या, कॉलेजला असताना रशियन अॅकेडमीतील विद्यार्थ्यांना भारतीय शिल्पकलेचे प्रात्यक्षिक दाखविताना तयार केलेले 'श्रीकृष्णाकडून कालियामर्दन' शिल्प, भारत-वेस्ट इंडीज क्रिकेट मालिकेसाठी तयार केलेले थम्स-अपचे मॉडेल, प्रभात चित्रमंदिरावर झळकणारं तुतारी वाजविणारं शिल्प, 'सिलसिला' चित्रपटासाठी ४० फुटी पोस्टर रंगवताना त्यात तब्बल ३७ फुटी रेखाटलेला अभिनेते अमिताभ बच्चन यांचा चेहरा, तसेच हौशी-व्यावसायिक उपक्रमांतर्गत 'सारे जहाँ से अच्छा', 'नन्ही दुनिया', 'वॉर मेमोरिअल', बडोद्याचे 'अक्षरधाम मंदिर' आदी कलाकृती त्यालाच नव्हे, तर पाहणाऱ्यांनाही समाधान देऊन गेल्याचा प्रमोदला मोठा आनंद आहे. नुकत्याच झालेल्या फ्रान्स दौऱ्यात प्रमोदला युरोपियन मराठी संमेलनात चित्र व शिल्पकलेचे प्रात्यक्षिक करण्याची संधीही मिळाली. लहानपणापासून जीवनाचे टक्केटोणपे खात, चांगले-वाईट दिवस अनुभवत, यशापयशाचा सामना करीत घडलेला प्रमोद पक्का व्यावसायिक आहे.

कलावंतानं आयुष्यभर भणंग असावं, फाटकेतुटके कपडे घालावेत, केस वाढवावेत वा विमनस्क अवस्थेत फिरून आपलं वेगळेपण दाखवावं, हे त्याला अजिबात मान्य नाही. कलावंताने कष्टाने कला आत्मसात केली असल्यानं त्याचं पुरेपूर मोल मिळालं पाहिजे, असं त्याला वाटणं साहजिक आहे. स्वतःच्या कष्टसाध्य कलेचं मार्केटिंग करा, असं त्याचं प्रत्येक कलावंताला सांगणं असतं. त्याने अगणित कलाकृती केल्या आहेत; पण प्रत्येक कलाकृती माझ्याकडून कोणीतरी करवून घेतल्याची त्याची भावना आहे. 'जेव्हा एखादी कलाकृती निर्माण होते, तेव्हा जाणवतं, की खरंच, हे काम आपलं नाहीये. कुणीतरी दुसरंच आपल्यामध्ये संचार करून या निर्मितीचा वाटा उचलतंय. खरंच कोणती शक्ती असेल ती? जी अमूर्तपणे माझ्याकडून अनेक कलाकृतींची निर्मिती करवून घेते? या शोधात आतापर्यंतचा खूप कालखंड गेला, तरी उत्तर शून्यच आहे,' अशी साधी-सोपी कविताही या भावनेवर त्याने रेखाटली आहे. प्रत्येक चित्र-शिल्पाच्या कथा व किस्से, तसेच रसिकांचे 'अनुभव' यांचा प्रचंड साठा त्याच्याकडे आहे. लहानपणापासून ज्यांच्या मदतीच्या हातांचा स्पर्श स्वतःच्या बोटांना झाला, अशांचे ऋण तो आजही बाळगून आहे.

अवहेलना व अपमान करणारांनाही तो विसरलेला नाही; कारण त्यांच्यामुळेच काहीतरी करून दाखविण्याची उर्मी निर्माण झाल्याची भावना तो व्यक्त करतो. स्टुडिओला लागलेली आग, त्यात जळून खाक झालेल्या अनेक कलाकृती, तसेच निवडणूक लढविण्याचा प्रकार, त्याची झालेली चांगली-वाईट चर्चा, कधी काळी पत्नीचे गहाण ठेवावे लागलेले दागिने, अशा सगळ्या घटना सतत जमिनीवर पाय ठेवून चालण्याची शक्ती देतात, असे तो सांगतो.

सतत कामात व्यग्र असणाऱ्या प्रमोदची काही स्वप्नेही आहेत. नगर शहरातील मोकळ्या भिंती रंगवून या शहराची ओळख निर्माण करणारी 'कलर सिटी', शहराच्या एका चौकात नृत्य, वाद्य, संगीत, चित्रकला, लेखन यांचा संगम असणारं शिल्प, स्थानिक लोकजीवनाचं दर्शन घडविणारं देशोदेशींच्या मास्कचं म्युझियम, गुरुकुल पद्धतीचं कलाजगत, आर्ट गॅलरी आदी बाबींची त्याची उर्मी उभरती आहे.